RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ११८] बुधवार, डिसेंबर २, २०२०/अग्र ११, शके १९४२ [पृष्ठ १, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगरविकास विभाग**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २०२०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक लामनपा-१०१६/प्र.क्र.११३/नवि-२४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-४५७(३) अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेमधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी "लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५६(अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून, शासन अधिसूचना क्र. लामनपा २०१६/प्र.क्र.११३/नवि-२४, दिनांक २ नोव्हेंबर २०१९ अन्वये प्रसिद्ध केले आहेत, आणि

ज्याअर्थी, लातूर महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त/जन्म-मृत्यू व विवाह नोंदणीसह) या पदाकरिता " मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (M.B.B.S.)" अशी शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे, आणि

ज्याअर्थी, वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त/जन्म-मृत्यू व विवाह नोंदणीसह) या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये सुधारणा करण्याबाबत लातूर शहर महानगरपालिकेने शासनास विनंती केली आहे, आणि

त्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक २ नोव्हेंबर २०१९ मधील परिशिष्ट (२) मधील अनुक्रमांक ७७ वरील वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त/जन्म-मृत्यू व विवाह नोंदणीसह) या पदाकरिता " मान्यताप्राप्त विद्यापीठाची M.B.B.S./B.A.M.S. (आयुर्वेद) पदवी. " अशी सुधारित शैक्षणिक अर्हता याद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.